पुढारी, लोकमत : 28.02.2023

# खेलो इंडियामध्ये यश जाधव-सरनाईकला तीन पदके

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



गुलमर्ग, श्रीनगर येथे सुरू असणाऱ्या तिसऱ्या खेलो इंडिया राष्ट्रीय विंटर गेम्सच्या आईसस्टॉक प्रकारात कोल्हापूरच्या यश आण्णासाहेब जाधव-सरनाईक याने तीन पदकांची कमाई केली. यात दोन सुवर्ण व एका कांस्य पदकाचा समावेश आहे. यशने दोन सांधिक व एका वैयक्तिक पदकाची कमाई केली.

यश स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी असून गेल्या तीन वर्षांपासून आईसस्टॉक या खेळात कोल्हापूरचे प्रतिनिधीत्व करत आहे. त्याला एशियन संघटनेचे महंमद इक्बाल, भारतीय संघटनेचे महेश राठोड, अजिय सर्वोदय, राज्य संघटनेचे सोमेश सनदी, राज्य बँकेचे माजी उपाध्यक्ष बाळासाहेब जाधव-सरनाईक, आण्णासाहेब जाधव-सरनाईक आदींचे मार्गदर्शन लाभले.

२ पुण्य नगरी
कोल्हापूर, मंगळवार, २८ फेब्रुवारी २०२३

# ऐश्वर्या पोवारला नेमबाजीत सुवर्ण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मध्य प्रदेश (भोपाळ) येथे झालेल्या खेलो इंडिया यूथ गेम्स स्पर्धेत ऐश्वर्या मुरलीधर पोवार हिने सुवर्णपदक पटाकवले. तिने महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना १० मीटर एअर रायफल मिक्स इव्हेंटमध्ये ही कामगिरी केली. ती विवेकानंद कॉलेजमध्ये बी.कॉम. भाग १ मध्ये शिकत आहे.

ऐश्वर्या पोवार हिला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखानाप्रमुख प्रा. किरण पाटील, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रशिक्षक संदीप तरटे यांचे मार्गदर्शन लाभले.

28/2/2023

पुण्यनगरी
28.02.2023

# 'विवेकानंद'मध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर :** दैनंदिन कार्यालयीन कामकाजामुळे प्रशासकीय कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. कर्मचाऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे व कार्यक्षमता वाढावी यासाठी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे 'ताणतणाव व राग व्यवस्थापन' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. माईंड ट्रेनर विठ्ठल कोतेकर यांनी यावेळी मार्गदर्शन केले.